**इंडिया फाऊंडेशन फॉर द आर्टस्**
त्यांच्या
आर्टस् प्रॅक्टिस कार्यक्रमांतर्गत
**कार्यशाळा / निवासी कार्यक्रम**
प्रकल्पासाठी प्रस्ताव मागवत आहे
**अर्ज संपूर्ण वर्षभर स्वीकारले जातील**

आर्ट्स प्रॅक्टिस कार्यक्रम अशा प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करतो जिथे कलाकार त्यांची कला नवीन पद्धतींनी वाढवायचा प्रयत्न करतात. यात रूढ संकल्पनांना आव्हान देणे असू शकते, कलानिर्मितीच्या सीमा रुंदावणे असू शकते, सादरीकरणातील नावीन्य असू शकते, स्थळ आणि प्रेक्षकांना गुंतवून ठेवण्याचा नवीन मार्ग असू शकते, एकंदरीत प्रयोगशीलतेला प्राध्यान्य देणारे असे काहीतरी असू शकते.

**कार्यशाळा / निवासी कार्यक्रम**
इतिहास साक्षीदार आहे की जेव्हा वेगवेगळ्या विषयांतील कलाकारांनी आपल्या संकल्पना एकत्र आणल्या, तेव्हा कलात्मक पद्धतींमध्ये महत्त्वपूर्ण प्रगती झाली. कलाकारांचे हे एकत्र येणे एखाद्या प्रदेशात किंवा वेगवेगळ्या पिढ्यांमधल्या कलाकारांनी एकत्र येणे या स्वरूपात असू शकते. कलाकार तंत्र आणि संकल्पनांवर चर्चा करतील, नावीन्य आणतील आणि त्यांत सुधारणा करतील. आज, कलात्मक कार्यशाळा आणि निवासी कार्यक्रम समवयस्क नेटवर्कसाठी महत्त्वपूर्ण जागा बनू शकतात जिथे सर्जनशील ऊर्जा एकत्र येऊ शकते. प्रथा कशा विकसित होत आहेत हे शोधण्यासाठी आणि त्या पुढे कशा पडत जात आहेत हे बघण्यासाठो या जागा कमी येऊ शकतात. हे कार्यक्रम, आतापर्यंत न ऐकलेले आवाज समाजापर्यंत पोहोचवण्यासाठीच्या जागा बनू शकतात.

आर्टस् प्रॅक्टिस कार्यक्रमांतर्गत, आम्ही कार्यशाळा / निवासी कार्यक्रमांसाठी प्रस्ताव आमंत्रित करतो आहोत. असे प्रस्ताव की जे देवाणघेवाण, संवाद, वादविवाद, शिक्षण आणि मार्गदर्शनाला चालना देणारी परिस्थिती निर्माण करू इच्छितात. यामध्ये कलाकारांचे संगोपन करणाऱ्या, सहयोगास प्रोत्साहन देणाऱ्या आणि प्रयोगांना सुलभ करणाऱ्या गोष्टींचा समावेश असू शकतो; कार्यशाळा किंवा इतर प्रकारचे एकत्रीकरण जे ज्ञान निर्माण करण्यास, दृष्टिकोन निर्माण करण्यास आणि कला पद्धतींचा विस्तार करण्यास मदत करतात.

**प्रकल्पाचा कालावधी:** कमाल सहा महिने
**एकूण खर्च (बजेट):** जास्तीतजास्त रुपये **3,00,000/-** (तुम्ही प्रस्तावित बजेटच्या कमाल 30% इतक्या रकमेची, मानधन म्हणून, विनंती करू शकता.)
**अंतिम तारीख:** अर्ज संपूर्ण वर्षभर स्वीकारले जातील

## अर्ज कोण पाठवू शकतात?
आम्ही विविध कलाप्रांतात काम करणाऱ्या कला उपासकांकडून प्रस्ताव आमंत्रित करतो आहोत. ज्यांत पुढील कलाप्रांतांचा समावेश असू शकतो:

- संगीत, ध्वनी, लेखन, नृत्य, चळवळ, थिएटर, बोलक्या भावल्या, कथाकथन, जादू, सर्कस आणि इतर परफॉर्मन्स कलांमध्ये काम करणारे कलाकार

- चित्रपट (माहितीपट आणि कथेवर आधारित), ॲनिमेशन, छायाचित्रकार, प्रदर्शननिर्माते, नवमाध्यम हाताळणारे, कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial intelligence), यांत्रिकनिर्मिती (robotics), संवादात्मक कलाप्रकार, खेळ, चित्रकला, शिल्पकला, printmaking, कॉमिक्स आणि इतर दृश्यकला प्रकारातील कलाकार.
- संग्राहक (Curators), विशेषकरून जे संग्रहालयाच्याऐवजी इतरत्र बाहेर कार्यरत आहेत ते.
- साहित्याशी निगडीत कवि, कादंबरीकार, नाटककार
- निरनिराळ्या कलाप्रांतात एकत्रितपणे काम करणारे कलाकार

**पात्रता:**

प्रस्ताव पाठवायची पात्रता भारतीय नागरिकत्व ही आहे. तुमचे प्रस्तावित सहकारीसुद्धा भारतीय नागरिक असणे अनिवार्य आहे. अधिक माहितीसाठी, इथे क्लिक करा.

**प्रस्ताव पाठवायची पद्धत:**

पत्ता, फोन नंबर आणि इमेल आयडी यासह तुमचा बायोडाटा आणि खालील बाबींसह प्रस्ताव:

- कलाकार म्हणून किंवा संग्राहक म्हणून तुम्हाला पडणारे प्रश्न
- कार्यशाळेसाठी / निवासी कार्यक्रमामागची तुमची प्रेरणा
- कार्यशाळेसाठी / निवासी कार्यक्रमासाठी तुम्ही निवडलेला नेमका विषय
- कार्यशाळेसाठी / निवासी कार्यक्रमासाठी तुम्ही निवडलेल्या संकल्पनेचा विस्तार
- मददगार / सहभागी / सहयोगकर्त्यांसाठी संकल्पित केलेला अनुभव
- कार्यशाळेसाठी / निवासी कार्यक्रमासाठी तुम्ही निवडलेली पद्धत
- तपशीलवार वेळापत्रक आणि बजेट
- या प्रयोगाशी संबंधित तुम्ही पूर्वी जे काम केले आहे त्याची उदाहरणे

तुम्ही तुमचा प्रस्ताव कोणत्याही भारतीय भाषेत किंवा इंग्लिशमधे लिहू शकता. आयएफए इंग्लिशव्यतिरिक्त भारतीय भाषांमधे लिहिल्या जाणाऱ्या प्रकल्पांना कायम प्रोत्साहित करते. तुम्ही तुमचे प्रश्न आणि कच्च्या संकल्पना, आयएफएच्या कर्मचाऱ्यांच्या प्रतिक्रियेसाठी, लेखी स्वरूपात, ध्वनी स्वरूपात किंवा चित्रीकरण करून पाठवू शकता.

तुम्ही तुमचा अंतिम अर्ज, 25 एमबी पर्यंतच्या, एकाच इमेलद्वारे, जॉन झेविअर्स, प्रोग्रॅम ऑफिसर, आर्टस् प्रॅक्टिस यांना john@indiaifa.org इथे पाठवू शकता. या इमेलची सब्जेक्ट लाईन असेल: **Project Proposal for Workshops/Residencies (Arts Practice).** शंका किंवा स्पष्टीकरणासाठी, याच ईमेलवर संपर्क साधू शकता.

**निवड झालेले सगळे प्रकल्प आयएफएद्वारे चालविले जातील.**

***कृपया लक्षात घ्या आयएफए एक असे सुरक्षित वातावरण तयार करण्यासाठी वचनबद्ध आहे जे मुलांसह प्रत्येकाला समर्थन देते, त्यांचा आदर करते आणि त्यांना संरक्षण देते. प्रत्येक अर्जदाराने हे ध्यानात ठेवले पाहिजे आणि या संकल्पनेशी कायम इमान राखले पाहिजे.***